# खबरबात

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४

उन्नती संस्था

सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

# आदिवासी मुलांनी चालवले गाव वाचनालय

उन्नती संस्थेतर्फे शहापूरमध्ये आश्रमशाळेत मुलांमध्ये नेतृत्व कौशल्य विकसनाचे काम सुरू आहे. शेणवा आणि बाबरे आश्रमशाळांमधील ७वी आणि ८वीचे निवडक विद्यार्थी यात सहभागी आहेत. यामध्ये मुलांना दिवाळीच्या सुट्टीत आपापल्या गावी गाव-वाचनालय चालवण्याचा उपक्रम दिला होता. यासाठी त्यांना पुस्तके दिली होती. आधी आवश्यक त्या कौशल्यांचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले. यामध्ये एकूण २१ मुली ८ मुले सहभागी झाली होती. ही मुले सुट्टीत १० गावांपर्यंत पोहचली. यात मुलांना आपापल्या गावात संमिश्र अनुभव आले. गावातील लोकांनी विविध गोष्टींची पुस्तके घेऊन वाचली, तर काही जणांनी शेतीच्या कामामुळे पुस्तके नाकारली. या प्रक्रियेतून त्यांच्यातील नेतृत्व गुणालाही वाव मिळाला. गावात गाव वाचनालय सुरू करण्यापूर्वी गणपतीच्या सुट्टीत या मुलांनी आपापल्या गावांचे कुटुंब सर्वेक्षण देखील केले होते. त्यावेळी मुलांमध्ये प्रश्न विचारण्याचे कौशल्य आणि उत्तरे शोधण्यासाठीच्या वाटाघाटीचे कौशल्य देखील वाढीस लागले. एकूणच या प्रक्रियेतून आदिवासी मुलांमध्ये नेतृत्व कौशल्य विकास व्हावा असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे.

**या निमित्ताने मुलांमधील संवाद कौशल्याला वाव मिळाला. विशेषतः गावातील मोठ्या पुरुषांशी बोलताना आपले म्हणणे पटवून देणे, पुस्तके घेण्यासाठी प्रवृत्त करणे यातून त्यांच्यातील मुलींचा आत्मविश्वास वाढला. गावातील समवयस्क मुली आणि मुले यांना एकत्र करून त्यांच्यासमोर पुस्तकांची मांडणी करून पुस्तके घेण्यास प्रवृत्त करण्यात आले. आणि त्यांच्यातील नेतृत्वाचा विकास व्हावा असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले होते.**






## शिक्षक अभ्यासगट

शिक्षकांनी 'मातृभाषा आधारित साक्षरता शिक्षणपद्धतीचा' वापर वर्गप्रक्रियेत करावा यासाठी शिक्षकांसोबत जवळून काम करण्याच्या उद्देशाने उन्नती संस्था काम करत असलेल्या केंद्रातील शिक्षकांसोबत एकूण ६ अभ्यासगट घेण्याचे ठरले. त्याची सुरुवात म्हणजे शिक्षक अभ्यास गटाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ या दिवशी पार पाडला गेला. यामध्ये अभ्यासगटचे स्वरूप व महत्त्व श्री. सुरेश कारंडे यांनी शिक्षकांना सांगितले. यात त्यांनी स्वतःचे बरेच अनुभव कथन केले. पहिला अभ्यासगट २५ नोव्हेंबर २०२३ ला 'मेंदुशास्त्र व मुलांचे शिक्षण' याविषयावर घेण्यात आला. भयमुक्त वातावरण असेल तरच मेंदू शिकणे, विचार करण्याचे काम सक्षमपणे करू शकतो. मेंदू अखंड सुरु असतो... इत्यादीबाबत डॉ. श्रुती पानसे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी रुधाडी, कोहा, कुंड, जनुना, वस्तापूर, चिचपाणी, डांगरखेड आणि खिरकुंड खुर्द या गावातील १३ शिक्षक अभ्यासगटामध्ये सहभागी झाले. पुढील अभ्यासगट 'गणित' या विषयावर आहे.

# अकोट प्रकल्पामधील मुलांचा चढता आलेख

या शैक्षणिक वर्षात जुलै २०२३ उन्नती संस्थेचे मातृभाषा आधारित साक्षरता वर्ग(शिकू आनंदे वर्ग) सुरु झाले. मुलांचे व स्वतःचे मूल्यमापन करणे गरजेचे असते त्यावरूनच कामाची व शिकविण्याची पुढील दिशा ठरविली जाते. आम्ही अर्धवार्षिक व वार्षिक चाचणीच्या माध्यमातून वर्षातून दोनदा मूल्यमापन करत असतो. शिकू आनंदे वर्गातील मुलांची अर्धवार्षिक चाचणी माहे ऑक्टोबरमध्ये घेण्यात आली. यामध्ये डांगरखेड, जनुना आणि खिरकुंड बु. या तिन्ही आदिवासी गावातील मुलांची वाचनाची आणि लेखनाची चाचणी घेण्यात आली. लेखनाच्या चाचणीत मुलांसोबत अक्षर-शब्द श्रुतलेखन, प्रश्न वाचन करून उत्तर लेखन करणे आणि हे उत्तर लेखन करत असताना जोडाक्षरी शब्द, स्वरचिन्हे, विरामचिन्हामध्ये पूर्णविराम, स्वल्पविराम हे तपासले गेले. निष्कर्षातून असे दिसले की, मुले वाचन लेखनात प्रगती करीत आहेत आणि **विशेष सांगायची बाब म्हणजे या तीनही वर्गांत माध्यमभाषा म्हणून तीन भाषांचा नियमित वापर केला जातो - कोरकू (मुलांची मातृभाषा), हिंदी व मराठी. वाचन व लेखन चाचणीमध्ये कोरकू व मराठी या दोन भाषा होत्या.**

### लेखन चाचणीतील मुलांमधील वाढलेल्या क्षमता

| | Marks % | % of Children डांगरखेड | % of children जनुना | % of Children खिरकुंड बु. |
|---|---|---|---|---|
| झकास | 100 | 0 | 4.5 | 9.5 |
| उत्तम | 75 To 99 | 88 | 54.5 | 61.9 |
| चांगला | 61 To 74 | 6 | 4.5 | 9.5 |
| समाधानकारक | 50 To 60 | 6 | 9.1 | 9.5 |
| बरा | 35 To 49 | 0 | 9.1 | 0 |
| असमाधानकारक | 01 To 34 | 0 | 18.2 | 9.5 |

### मुलांच्या वाचन क्षमता

| | मुळाक्षर गट | | चौदाखडी गट | | जोडाक्षर गट | | वाचन गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जुलै | ऑक्टो. | जुलै | ऑक्टो. | जुलै | ऑक्टो. | जुलै | ऑक्टो. |
| जनुना | ३६ % | १८ % | ६४ % | १८ % | ० % | ० % | ० % | ६४ % |
| डांगरखेड | ३८ % | ० % | ६३ % | ० % | ० % | ० % | ० % | १०० % |
| खिरकुंड ब. | ९० % | ३३ % | १० % | ६२ % | ० % | ५ % | ० % | ० % |


## वाचन करता येत नाही म्हणून काय झाले, मी परिपाठ घेणारच- अंजना

अडीच तासांच्या आमच्या वर्गात रोज १५ मिनिटे परिपाठ होतो. यात मुख्यतः राष्ट्रगीत, भारताचे संविधान, प्रतिज्ञा, प्रार्थना असे नित्यनियमाने होते. हे सर्व मुलेच घेतात. त्यांचे गट ठरलेले आहेत, जे त्यांच्या ठरलेल्या दिवशी परिपाठ घेतात. यामध्ये ठरलेला वाचन गट पुस्तकात पाहून संविधान, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा घेतो व त्यांच्या मागोमाग वर्गातील अन्य मुले अनुकरण करून बोलतात.



जनुना वर्गात तीन मुलांना वाचनात अडचण आहे. त्यातील अंजना नावाची मुलगी एका गटात होती. गटातील अन्य मुले अंजनाला म्हणाली, "तुला वाचता येत नाही, मग तू परिपाठ कसा घेणार?" तेव्हा अंजना म्हणाली ." वाचन करता येत नाही म्हणून काय झाले? मी तुमच्यासोबत समोर तर येऊन उभे राहू शकतेच." तिचा तो आत्मविश्वास खूप महत्त्वाचा होता. यामुळे कोणत्याही गटातील मुलांनी त्यांच्या गटातील मुले बदलण्याची मागणी केली नाही. सर्व गटातील ज्या मुलांना अजून अस्खलित वाचन करता येत नाही त्यांना गटातील अन्य मुलांनी स्वीकारले. आता सर्व गटातील ज्या मुलांना वाचन जमत नव्हते, त्यांना आता प्रतिज्ञा, भारताचे संविधान पाठ झाले आहे.





## आदिवासी मुले आणि चित्रपट

प्रसारमाध्यमांच्या दुनियेला अजूनही फारशी परिचित नसलेली बाबरे आणि शेणवे येथील शाळेतील मुले-मुलीना 'मुस्कान' हा कार्टून चित्रपट दाखवण्यात आला. चित्रपटाच्या निमित्ताने बिंनधास्त संवाद करणारी, स्वतःची मते मांडणारी, न्यायासाठी पैज लावणाऱ्या एका लहान मुलीबाबत चर्चा सत्र घेण्यात आले. तसेच समानता म्हणजे काय असते यावर चर्चा घेण्यात आली. यावेळी प्रत्येक मुलीने आणि मुलाने त्यांचे मत मांडण्याचा प्रयत्न केला. तर अनेकांनी प्रथमच चित्रपट पाहात असल्याचेही सांगितले. चित्रपट पाहणे ही त्यांच्यासाठी आनंददायी प्रक्रिया होती. या चित्रपटानंतर विद्यार्थ्यांनी विविध पोस्टर्सच्या माध्यमातून त्यांना समजलेली समानता दाखवण्याचा प्रयत्न केला.

## शाळासख्यांनी निवडली मुलांसाठी पुस्तके

शहापूर येथे शाळासखी म्हणून काम करणाऱ्या पाच कार्यकर्त्यांनी मुंबईतील 'कहानी ट्री' व मॅजेस्टीक या लहान मुलांसाठी पुस्तके विकणाऱ्या दुकानाला भेट दिली. मुलांसोबत काम करणाऱ्या शाळासखींना पुस्तक खरेदी उपक्रमात सहभागी करून घेतले गेले. वर्षभर मुलांबरोबर वाचनालयाचे काम करत असताना उन्नतीच्या शाळा सख्यांना मुलांची वाचन आवड व गरज समजली आहे हे लक्षात घेता त्यांनाच पुस्तके खरेदी करण्याची संधी देण्यात आली.

त्यानुसार, ५-६ तास विविध पुस्तके हाताळून सख्यांनी मुलांसाठी सुमारे ८ हजारांची पुस्तके निवडून विकत घेतली. तसेच कहानी ट्रीच्या संस्थापक संगीता यांच्याशी गप्पा मारल्या. यामध्ये त्यांनी पुस्तकांची रचना, चित्र पुस्तके, पुस्तकांचा व्यवसाय, लहान मुलांसाठी पुस्तके कशी असावीत याबाबत त्या खूपच जागरुक असल्याचे सांगितले. कामाची आणि निर्णयाची भागीदारी ही मूल्य या निमित्ताने जपता आली.

# पानांपासून बनवला उंदीर

वाचनालयाच्या माध्यमातून भाषिक अभिव्यक्तीसाठी चालना आम्ही देतच असतो, पण कला हे सुद्धा अभिव्यक्तीचे प्रभावी साधन आहे असे आम्ही मानत असल्याने वाचनालयाच्या सत्रांमध्ये विविध कलासत्रे देखील उन्नती संस्थेतर्फे घेतली जातात. यावेळी निसर्गात असणाऱ्या गोष्टींपासून काही कलाकृती करू असे म्हणत, जास्वंदीच्या पानांपासून उंदीर बनवण्यात आला.



यासाठी लागणारी आवश्यक आकाराची पाने शोधून आणणे आणि योग्य पद्धतीने ती चिकटवणे यामध्ये मुलांनी हस्तकलेचा मनमुराद आनंद लुटला. उन्नती संस्थेच्या शहापूर संघासोबत कला सत्राचे प्रशिक्षण झाले होते. त्यात मुंबईचे कलाकार रणजीत कोकाटे यांनी चित्रकला व हस्तकला यातील फरक समजावून सांगत, हस्तकलेचे कौशल्य व दृष्टी देण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर संघाला काही असाईनमेंट पण दिल्या होत्या. त्याचाच एक भाग म्हणून शाळासख्यांनी आपल्या शाळांमध्ये कलेची सत्र मुलांसोबत घेतली. शेणवे येथील आश्रमशाळा आणि कोठारे येथील शाळेतील मुलांनी हा प्रयोग केला. यातून मुलांमध्ये विविध आवश्यक साहित्याचा शोध घेणे, कलाकृती पूर्ण आणि छान व्हावी यासाठी काम करत राहणे; यामुळे मुलांमध्ये चिकाटी आदी कौशल्ये विकसित होतात.



## शरीर ओळख-

शेणवे आणि बाबरे या आश्रमशाळांतील ७वी ते १०वी च्या मुलींबरोबर 'शरीर ओळख' हे सत्र घेण्यात आले. यामध्ये कार्ड पेपर आणि स्केचपेन यांच्या मदतीने मुलीचे शरीर दाखवण्यास सांगण्यात आले; परंतु मुलींना आपल्या शरीरिक अवयवांची नावे घेण्यास लाज वाटते असे लक्षात आले. त्यानंतर मग त्यांना आपल्या शरीराचे अवयव, त्याचे महत्त्व, नैसर्गिक वाढीदरम्यान त्यात होणारे बदल, अवयवांची स्वच्छता यावर चर्चा करण्यात आली. सुरुवातीच्या वेळी केवळ कुजबुजणाऱ्या मुली हळूहळू या सत्रात खुलत गेल्या.

## वाचनाची आवड आणि गरज

शहापूर येथील बाबरे आश्रमशाळेमध्ये आदिवासी जमातीतील कातकरी मुलांबरोबर उन्नती संस्था काम करत आहे. कातकरी समाज एकूणच शिक्षण प्रवाहात मागे आहे. या मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजवताना आम्हाला बरेच कष्ट पडतात, पण गेल्या वर्षापासून सुरू झालेल्या या प्रकल्पामध्ये आता काही चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

सुरुवातीच्या काळात या वर्गातील मुले पुस्तके हातात घेत, पण वाचत नसत. वर्गात नुसता कल्ला करत असत. वाचताना साक्षरतेचे येणारे प्रश्न आणि पुस्तकांबाबतचा नवखेपणा अशी दोन्ही कारणे दिसत होती. हळूहळू गोष्ट सांगणे, वाचून दाखवणे अशा विविध कृतीमधून मुलांना पुस्तकाविषयी कुतुहल निर्माण होऊ लागले. पुस्तकाची ओळख आवर्जून करून दिल्याने आता पुस्तके आपली असतात, असे त्यांना वाटू लागले आहे. हळूहळू मुले पुस्तके हातात घेऊ लागली आहेत. वाचता येत असेल तर उत्तम पण नसेल येत तरी, पुस्तके चाळणे, त्यातील चित्र पाहणे अशाप्रकारे त्यांची पुस्तकाशी मैत्री होऊ लागली आहे. तसेच येथे गोष्ट वाचली की, सकाळी ती परिपाठाच्या वेळी सांगायला संधी मिळते आणि त्यामुळे अन्य विद्यार्थ्यांमध्ये आपण उजवे ठरतो असे देखील त्यांना लक्षात येऊ लागले आहे. त्यामुळे देखील पुस्तके मागून घेणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे.

बाबरे येथे हळूहळू निर्माण होणारी ही आवड आता अन्य मुली-मुलांतही पसरू लागल्याने शाळासखी आणि शाळेतील शिक्षक यांचा उत्साह देखील वाढला आहे.



### अर्धवार्षिक आढावा सभा

उन्नती संस्थेतर्फे विविध उपक्रमाच्या आढावा सभा प्रत्येक महिन्यात दोन वारी होतातच. पण मोठा व सर्वंकष आढावा वर्षातून दोन वेळा घेतला जातो. त्यातील एक म्हणजे अर्धवार्षिक आढावा नोव्हेंबर महिन्यात ३ ते ९ नोव्हेंबर या काळात घेण्यात आला. काम करताना आलेले विविध अनुभव, त्रुटी, प्रयोग, त्यावरील उपाय, कार्यक्रमाचे पुढील स्वरूप व नियोजन अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यासाठी संपूर्ण उन्नती संघ आणि मॅनमेंटमधील मंडळी सहभागी होती.





# संस्थेतील कार्यकर्त्यांची प्रशिक्षणे आणि सक्षमीकरण

## आदिवासी मुलांसाठी साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण

बहुतांश प्रस्थापित प्रकाशने ही शहरी आणि निम शहरी भागातील मुलांच्या भावविश्वातील गोष्टी लिहितात. ग्रामीण व विशेषत: आदिवासी भागातील मुलांचे जीवन व भावविश्व असलेल्या गोष्टी खूप अभावाने आढळतात. आम्ही काम करीत असलेल्या क्षेत्रातील आदिवासी समाजातील मंडळींकडून गोष्ट लेखन करून घ्यावे या हेतूने आमच्या कार्यकर्त्यांसाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. गोरेगाव येथील वीणा तांबे यांनी हे प्रशिक्षण दोन टप्प्यांमध्ये दिले.



## कर्मचारी प्रशिक्षणे

ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधी दरम्यान एकूण ११ प्रशिक्षणामध्ये अकोला व शहापूर संघातील १६ सदस्यांनी सहभाग घेतला. त्यातील ३ प्रशिक्षणे ही बाहेरील संस्थेमार्फत झाली व त्यात संस्थेच्या ५ संघ सदस्यांचा सहभाग होता. ही प्रशिक्षणे पुढीलप्रमाणे - (१) लायब्ररीसे दोस्ती (एकलव्य,भोपाळ) (२).वाचनालय कार्यशाळा (बुकवर्म, गोवा) (३)सहभागी शिक्षण पद्धत (लखनऊ) या शिवाय संस्थेअंतर्गत झालेली प्रशिक्षणे अशी - (४) मुलांची भाषा नि शिक्षण (पुणे) (५)मन:स्वास्थ, (६)मानक कार्यप्रणाली, (७)गोष्ट कशी सांगावी, (८)कलेतील सर्जनशीलता व कौशल्य यातील फरक.

## उत्सव बाईपणाचा

नवरात्रीच्या काळात शहापूर येथील शेणवे कार्यालयात संस्थेच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी 'उत्सव बाईपणाचा' हा कार्यक्रम २८ ऑक्टोबर २३ रोजी साजरा करण्यात आला. यामध्ये शहापूर येथील आदिवासी पाड्यात काम करणाऱ्या चार पेसा वर्कर, उन्नती परिवारातील ८ महिला कार्यकर्त्यांची टीम, तर अकोला येथील ४ महिला कार्यकर्त्या आणि १ पुरुष कार्यकर्ता असे सर्व उपस्थित होते . यावेळी 'लिंगभाव' या विषयात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मेधाविनी नामजोशी यांनी विषय मांडणी केली. बाई म्हणून जगताना बाईपण जपणं, जगणं आणि बाळगणं याचे अनेक पैलू त्यांनी यावेळी उलगडून दाखवले. स्त्रीवाद आणि पुरुषवाद हे वेगळे नसतात, हे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

## विकास स्वत:चा आणि संस्थेचा

संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत विकासासोबत संस्थेचे काम अधिक गतीशीलतेने आणि परिणामकारकरित्या व्हावे यासाठी संस्थेतील प्रमुख कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये कार्यकर्त्यांची वैयक्तिक उद्दिष्ट्ये आणि संस्थेची उद्दिष्ट्ये यांची सांगड घालून संस्था पुढे नेता येईल, अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तसेच सकारात्कता आणि स्वयंप्रेरणेने काम करणे याबाबत विविध क्रियाकलापांचाही उपयोग करण्यात आला. या विषयातील अभ्यासू, सल्लागार आणि ज्येष्ट पत्रकार इब्राहीम अफगाण यांनी याबाबत मार्गदर्शन केले. तर संस्थेचे संस्थापक, मुख्य समन्वयक, समन्वयक, सुलभक, कन्सल्टन्ट असे एकूण १२ कार्यकर्ते उपस्थित होते.

## अभ्यासक्रम निर्मिती कार्यशाळेत सहभाग

Centre for Mental Health, Law and Policy ही संस्था किशोरवयीन मुला-मुलींसाठी 'मानसिक आरोग्य' या विषयात एक अभ्यासक्रम तयार करीत आहे. या अभ्यासक्रम निर्मितीमध्ये त्यांनी उन्नती संस्थेला सहभागी करून घेतले. नोव्हेंबर महिन्यात अशा दोन कार्यशाळांमध्ये संस्थेने योगदान दिले. आदिवासी भागातील मुला-मुलींचे मानसिक आरोग्यविषयक मुद्दे या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची ही चांगली संधी आम्ही घेतली. यामध्ये आम्ही आदिवासी मुलांच्या मूलभूत गरजा, कुटुंबापासून दूर राहत असल्याने त्यांच्या मनात एकटेपणाच्या भावना, नावडते अन्न, अंघोळीला न मिळणारे गरम पाणी आणि वागण्यातील मोकळेपणा मिळत नसल्याने होणारी कुचबंणा अशा काही मुद्द्यांची मांडणी केली.

# आदिवासी गावातील मुलींना पुढे शिकावं वाटतं पण...

'गाव वाचनालय' या उपक्रमात आमचा घरा-घरात संपर्क निर्माण झाला आहे. त्यावेळी पुस्तक देवघेव करताना खिरकुंड बु. येथील बारावी पास 'वैष्णवी बेलसरे' हिची ओळख झाली. पुढील शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी तिने व तिच्या घरच्यांनी बरेच प्रयत्न केले. या प्रक्रियेबाबतचे नेमके स्वरूप त्यांना माहित नसल्याने २–३ महिने तिचे तसेच वाया गेले. शिवाय अकोट या तालुक्याच्या ठिकाणी सतत खेटे घालणे तिला आर्थिकदृष्ट्या परवडत नव्हते. प्रवेश शुल्क भरण्यासाठी सुद्धा तिची आर्थिक परिस्थिती नसल्याने ती व तिचे कुटुंबीय विचारात पडले होते. शेवटी त्यांनी आपले सर्व प्रयत्न थांबवले होते. पुस्तकांवर चर्चा करताना तिची ही माहिती आमच्यासमोर आली. मग संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आपल्या स्तरावर प्रयत्न सुरु केले आणि शेवटी तिला मुंडगाव येथील 'शोभाताई कॉलेजमध्ये' प्रथम वर्षाला प्रवेश मिळवून दिला. आता तिचे शिक्षण सुरु झाले आहे. या दरम्यान हे लक्षात आले की, योग्य माहिती व मार्गदर्शनाचा अभाव, महाविद्यालये लांब असणे, प्रवासासाठी सुविधांचा अभाव अशा विविध कारणांनी आदिवासी गावांतील महिला व मुली यांच्यात शिक्षणाची इच्छा असताना सुद्धा त्यांना शिक्षण मधेच थांबवावे लागते.

या उदाहरणामुळे आम्ही माहे ऑगस्ट २०२३ मध्ये महिला व मुलींचे सर्वेक्षण हाती घेतले. ज्या महिला / मुलींचे शिक्षण बंद झाले आहे, पण त्यांना अजूनसुद्धा पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे. अश्या मुली व महिलांचे सर्वेक्षण 'जनुना व खिरकुंड बु.' या दोन गावांमध्ये घरोघरी जाऊन केले. आम्हाला समजले की, जनुना येथील ३१ महिला/मुलींना व खिरकुंड बु येथील १३ महिला/मुलींना पुढे शिक्षण घ्यायची इच्छा आहे. या दरम्यान २ मुलांनीसुद्धा पुढे शिक्षण घेण्याची इच्छा दर्शवली. या मुलींच्या शिक्षणासाठी संस्थेमार्फत प्रयत्न सुरु करण्यात आले.

या दरम्यान अजीम प्रेमजी विद्यापीठ (Azim Premji University) यांचे 'मुला मुलींच्या उच्च शिक्षणासंदर्भात 'APU मधील संधी' असे एक आभासी सत्र विप्रो फाऊंडेशनने आयोजित केले होते, उन्नती संस्था ही विप्रो फाऊंडेशन या देणगीदार संस्थेची सहयोगी संस्था म्हणून काम करते त्यामुळे आम्हाला या सत्रामध्ये उपस्थित राहण्याचे निमंत्रण मिळाले. यामध्ये ज्या मुला मुलींचे शिक्षण थांबले आहे व पुढे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा मुलीना काही निकषांच्या आधारावर भोपाळ, मध्य प्रदेश व बंगळूर, कर्नाटक येथे प्रवेश घेता येईल असे त्यांच्याद्वारे सांगण्यात आले. यानुसार आमच्याकडे आलेल्या यादीतील ६ मुलामुलींचे फॉर्म 'अजीम प्रेमजी विद्यापीठात' पदवी शिक्षणासाठी भरण्यात आले. या मुलांसोबत दिनांक ३० नोव्हेंबर व १ डिसेंबरला गणित व इंग्रजी या विषयावर आभासी स्वरुपात सेतू अभ्यासक्रम घेण्यात आला. यामध्ये ५ जण सहभागी झाले होते. त्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली पुढील प्रक्रिया अजून सुरु आहे

**OUR BANKER:**
PUNJAB NATIONAL BANK, M. G. ROAD, THANE (WEST) MAH. 400602

**ACCOUNT NAME:** UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE

**SAVINGS AC NO.:** 3739 0001 0064 2890

**IFSC :** PUNB0373900

**QR CODE FOR DONATIONS:**

**YOU MAY ALSO DONATE IN TWO INSTALMENTS IN A YEAR.**

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**पत्ता- उन्नती संस्था, ४०२, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ, टिळक नगर,
डोंबिवली पूर्व, ४२१२०१**

unnati.isec@gmail.com

9892103371

https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL